संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हवाई उड्डाणाचा विचार करताना रेल्वेचा विचार करा

**साठ** सत्तर वर्षापूर्वी आकाशात विमान दिसणे ही अबालवृध्दांसाठी कुतुहलाची आणि जिज्ञासेची गोष्ट होती. आज परिस्थिती प्रचंड बदलली आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे जग इतके जवळ आले आहे की, विमान प्रवासही तितकाच सहज झाल्यासारखी परिस्थिती आहे. विमानाचा शोध कोणी लावला. यापेक्षाही आता विमान प्रवासाची किंवा हवाई सेवेची कोणत्या देशात सर्वाधिक सुविधा आहे याला प्राधान्य प्राप्त झाले आहे. कवीने साठ सत्तर वर्षापूर्वी केलेली विमानाविषयीची कल्पना आणि त्यात एखादी घार आकाशात फिरावी तसे विमानाचे वर्णन केले गेले होते. आज ती परिस्थिती नाही. आज तर जगाच्या अनेक भागांमध्ये किंवा मुंबईसारख्या महानगराच्या विमानतळांवर कावळ्या चिमण्यांसारखी विमानांची ये जा चालू असते. दर तीन मिनिटाला एक विमान मुंबईच्या विमानतळावरून उड्डाण करते. विमान सेवेची ही गरज आता अनिवार्य वाटू लागल्यामुळेच केंद्र सरकारने २०४० पर्यंतचे आपले हवाई धोरण तयार केले आणि देशाच्या प्रत्येक गावामध्ये किमान एक हेलिपॅड आणि देशातील प्रत्येक नागरिकाला उपलब्ध होईल असा किमान भाड्यातला विमान प्रवास देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जगाच्या बरोबर जाण्याकरीता अशा प्रकारच्या उद्दिष्टांची गरज आहेच. परंतु त्याच्याबरोबरीने जमिनीवरची काय परिस्थिती आहे याचाही अंदाज घेतला पाहिजे. कारण केंद्र सरकारच्या या हवाई धोरणाला अनुसरून महाराष्ट्र सरकारने तर या हवाई क्षेत्रात हनुमान उडी घेण्याचेच ठरवलेले दिसते आणि राज्यातल्या प्रत्येक गावाजवळ हेलिपॅडची उभारणी आणि शंभर किलोमीटर अंतरावर एका विमानतळाची निर्मिती असे उद्दिष्ट ठेवले आहे, याकरीता २०२३ पर्यंतची कालमर्यादा घालून घेतली गेली. एवढेच नव्हे तर राज्यातील प्रत्येक जिल्हा २०३० पर्यंत मुख्य हवाई मार्गाशी जोडण्याचाही राज्याचा विचार आहे.

## विकासातला विरोधाभास

या सगळ्या योजनांच्या भराऱ्या मारत असताना एकूण राज्यातील परिस्थिती काय आहे. याचे भान ठेवले गेले तर अधिक चांगले होईल. शेतकऱ्यांना आपल्या शेतावर जायला नीट रस्ते नसतात. शेतातला माल बाजारपेठेपर्यंत आणण्याकरीता रस्त्यांचा ठिकाणा नाही. राज्यातल्या पन्नास टक्क्यापेक्षा जास्त लोकांना स्वतःचे घर नाही. शाळा, आरोग्य, या सुविधांपासून सामान्य माणूस अजूनही वंचित आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शाळेत पोहचण्याकरीता नदी ओलांडून जावे लागते. पावसाळ्यात वेळ आली तर पोहत पोहत शाळा गाठावी लागते. अशा एक ना अनेक समस्यांचा डोंगर असताना सरकारने हवाई धोरणासाठी जोरदार तयारी करावी याचे कोणालाही आश्चर्य वाटेल. एक गोष्ट मात्र खरी की हे सरकार रस्ते पुरवू शकत नाहीत आणि वाहनांची संख्या रोखू शकत नाही. अशावेळी कदाचित हा हवाई प्रवास निदान पंचवीस टक्के लोकांना सोयीचा वाटू शकेल. रस्ते अपघातात दरवर्षी दहा हजार लोक राज्यात मृत्युमुखी पडतात. कदाचित या हवाई प्रवासामुळे रस्ते अपघात कमी होऊ शकतील परंतु तरीही या हेलिपॅडपर्यंत किंवा विमानतळापर्यंत पोहचण्याकरीता सुसज्ज रस्त्यांची आवश्यकता भासेलच. म्हणूनच सर्वसामान्य माणसाला परवडणारा रस्ते प्रवास काही प्रमाणात तरी चांगला करणे गरजेचे आहे. हवाई प्रवासाच्या हवाहवाई गप्पा मारताना जमिनीवरची परिस्थिती काय आहे हेही लक्षात घ्यावे लागेल. म्हणजेच विरोधाभास प्रचंड असताना केवळ आकर्षणापोटी पैसा खर्च करणे आणि मूलभूत सोयीसुविधांकडे दुर्लक्ष केले जाते. ज्याप्रमाणे बुलेट ट्रेनचा प्रकल्प राबवताना मुंबईतल्या लोकलट्रेनचे तीन तेरा वाजलेले सरकारला दिसत नाहीत. बुलेट ट्रेनसाठी राज्य सरकार पन्नास हजार कोटी रुपये देऊ शकते. पण मुंबईच्या लोकल ट्रेनकरीता पंचवीस हजार कोटीही द्यायला तयार नाही हाच तो विरोधाभास ठळकपणे दिसून येतो.

## काकोडकरांच्या रेल्वे सुधारणांचे काय?

राज्याचे हे हवाई धोरण ठरवताना हवाई टॅक्सीचाही विचार केला गेला आहे आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ अनिल काकोडकर यांच्या सूचनेनुसार या हवाई धोरणाची रचना केल्याचे राज्य सरकारने म्हटले आहे. परंतु याच अनिल काकोडकरांनी रेल्वे व्यवस्था सुधारण्याकरीता भलामोठा अहवाल सादर केला होता. तो बासनात गुंडाळला गेला होता. मुंबईच्या उपनगरीय रेल्वेच्या वेळापत्रकाबाबत बऱ्याच गोष्टी त्यातून सुचवल्या गेल्या. ही रेल्वे सेवा एकाचवेळी लाखो लोकांना उपयोगी पडते. तिच्याकडे दुर्लक्ष करायचे आणि नवीन योजनांसाठी सर्वशक्ती पणाला लावायची. हा प्रकार समतोल विकासाला धाब्यावर बसवणारा ठरतो. एकीकडे हे धोरण जाहीर होत असताना त्याचदिवशी मुंबई विमानतळावर उभ्या असलेल्या जेट एअरवेजच्या बोईंग सातशे सत्याहत्तरमध्ये एक घुबड जाऊन बसले होते. ते कॉकपीटमध्येच घुसल्यामुळे सगळ्यांचीच पाचावर धारण बसली. विमानतळ परिसरात मोठ्या प्रमाणावर मटणाची दुकाने असल्यामुळे हा प्रकार झाल्याचे सांगितले गेले आणि आता जर गावागावात हेलिपॅड आणि विमान उतरवण्याची सोय झाली तर तिथे काय काय परिस्थिती उद्भवेल याचीसुध्दा सहज कल्पना येऊ शकते. आपल्या देशातील भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती इतर देशांपेक्षा वेगळी आहे यात बदल करत असताना वस्तुस्थितीची जाणीव ठेवावी लागेल. नव्या मुंबईतील दुसऱ्या विमानतळाची घोषणा होऊन पंचवीस वर्षे उलटून गेली. अजूनही हे विमानतळ आकाराला आलेले नाही. हाच जर विमानसेवेचा वेग असेल तर प्रत्येक गावात हेलिपॅड किंवा विमानतळाची योजना पुढच्या शंभर वर्षात हळूहळू आकाराला येईल असे समजायला हरकत नाही. उत्साहात मारलेल्या या हनुमान उडीने तोंड पोळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.